नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३४३ | Issue - 343 | वार बुधवार दि. ६ मे २०२६ | Blow- Wednesday Date 6 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ममता दीदींचा मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्यास नकार

## हा पराभव नाही, तर लोकशाहीचा... निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह; बॅनर्जींच्या लढ्याला राष्ट्रीय नेत्यांचे बळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या अनपेक्षित निकालानंतर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी या निकालावर तीव्र आक्षेप घेत आक्रमक भूमिका मांडली आहे. आम्ही निवडणुकीच्या मैदानात पराभूत झालेलो नाही, तर तब्बल १०० जागांवर पद्धतशीरपणे मतांची लूट करण्यात आली आहे, असा खळबळजनक दावा त्यांनी केला. ही लढाई केवळ भारतीय जनता पक्षाविरुद्ध नव्हती, तर निवडणूक आयोगाच्या कथित पक्षपाती कार्यपद्धतीविरुद्धही होती, असे सांगत त्यांनी सध्याच्या परिस्थितीत मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यासाठी राजभवन येथे जाण्यास स्पष्ट नकार दिला आहे.



निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले. त्यांच्या मते, आयोगाचा संपूर्ण कल हा सत्ताधारी भाजपला झुकते माप देणारा होता. देशात लोकशाहीची उघडपणे हत्या केली जात आहे. मी नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे आणि यापुढेही तो सुरूच राहील. मी राजीनामा देण्यासाठी राजभवनात का जावे? लोकशाही मार्गाने निवडून येण्याचा सन्मान जर पायदळी तुडवला जात असेल, तर त्या यंत्रणेसमोर झुकणार नाही, असे त्या म्हणाल्या. निवडणुकीदरम्यान झालेल्या पोलीस आणि सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या तसेच ईव्हीएम (एतच्) मशीनच्या हाताळणीबाबत त्यांनी संशय व्यक्त केला आहे.

बंगालमधील या राजकीय संघर्षात ममता बॅनर्जी एकट्या पडलेल्या नाहीत. 'इंडिया' आघाडीतील प्रमुख नेत्यांनी त्यांना आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि हेमंत सोरेन यांसारख्या बड्या नेत्यांनी फोनवरून त्यांच्याशी संवाद साधून या परिस्थितीत खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले आहे. लवकरच अखिलेश यादव देखील त्यांची भेट घेणार असून, हा लढा आता बंगालपुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होताना दिसत आहे. मतमोजणीच्या दिवशी झालेल्या घडामोडींचे वर्णन करताना ममता बॅनर्जींनी 'काळा इतिहास' असा शब्दप्रयोग केला. मोजणी केंद्रांवर धाकदपटशहा दाखवून ती हायजॅक करण्यात आली, असा आरोप त्यांनी केला. एका महिला मुख्यमंत्र्याला जर मतदान केंद्रातून धक्के मारून बाहेर काढले जात असेल, तर सामान्य मतदाराची सुरक्षा काय? असा संतप्त सवाल त्यांनी केला. निकालानंतर तृणमूलच्या अनेक कार्यालयांवर ताबा मिळवण्यात आला असून कार्यकर्त्यांना लक्ष्य केले जात असल्याचा दावाही त्यांनी या वेळी केला.

सत्य शोधण्यासाठी १० सदस्यीय समितीची घोषणा

या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आणि कायदेशीर लढाई लढण्यासाठी तृणमूल काँग्रेसने १० सदस्यीय 'फॅक्ट फाइंडिंग कमिटी' (सत्यशोधन समिती) स्थापन केली आहे. ही समिती राज्यातील विविध मतदारसंघांना भेटी देऊन तिथे झालेल्या कथित गैरप्रकारांचा अहवाल तयार करेल. हा विजय जनतेचा नसून सत्तेचा गैरवापर करून मिळवलेला विजय आहे. आम्ही पुन्हा फिनिक्स पक्षाप्रमाणे राखेतून झेप घेऊ, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारला देशात केवळ एकपक्षीय राजवट आणायची असून, यामुळे जागतिक स्तरावर भारताच्या लोकशाहीची प्रतिमा मलिन होत असल्याची टीका त्यांनी शेवटी केली.

# महाराष्ट्रातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारचा विशेष दिलासा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्रातील हरभरा (चना) उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये चना खरेदीची कमाल मर्यादा वाढवून ८.१९ लाख मेट्रिक टन करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सुमारे ४,८१६.८० कोटी रुपयांची किमान आधारभूत किंमत सुरक्षा आता शेतकऱ्यांना मिळणार आहे.

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य व हमीभाव मिळावा यासाठी हा महत्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. याबरोबरच खरेदीची अंतिम मुदत वाढवून २९ मे २०२६ पर्यंत करण्यात आली आहे. त्यामुळे जे शेतकरी वेळेत आपला माल विकू शकले नाहीत, त्यांनाही आता या आधारभूत किंमतीचा लाभ घेण्याची संधी मिळणार आहे.

महाराष्ट्रातील हरभरा उत्पादकांसाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून, हजारो शेतकऱ्यांना थेट आर्थिक दिलासा मिळणार आहे.

# मंत्रिमंडळ बैठकीत ३ महत्त्वाचे निर्णय; आदिवासी मुलांचे शिक्षण, धाराशिव अन् सोलापूरसाठी विशेष मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (५ मे) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कही महत्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठीचा निर्णय, सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी आणि श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांना फायहा होणार असून आदिवासी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीला गती मिळणार आहे. आदिवासी बांधवांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण निर्णय. स्वयंसेवी संस्थाच्या पाच प्राथमिक व १९ माध्यमिक अनुदानित आश्रमाशाळांची श्रेणीवाढ. प्राथमिकमधून माध्यमिक आणि माध्यमिकमधून कनिष्ठ महाविद्यालय अशी श्रेणीवाढ, त्यासाठी आवश्यक पदनिर्मिती व आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मंजुरी. डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार.

सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७) पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी. सोलापूर आणि आजुबाजुच्या परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरूंच्या दृष्टीने हिताचा निर्णय. प्रत्येकी साठ प्रवेश क्षमतेचे एआय अँण्ड मशिन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनियरींग, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन असे तीन नवे अभियांत्रिकी अभ्यासक्रम. (उच्च व तंत्रशिक्षण विभाग)

धाराशिव जिल्हयातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माध्यमातून चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याचा निर्णय. महाविद्यालयाचे सक्षमीकरण होणार, अद्ययावत शैक्षणिक सोयी-सुविधांमुळे या परिसरातील होतकरूंना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण उपलब्ध होण्याची संधी. (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) मंत्रालयात आज कॅबिनेट बैठक बोलावण्यात आली होती. यावेळी लैंगिक शोषणातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेट बैठकीत दिले आहेत. लैंगिक प्रकरणातील आरोपी हे ८० ते ९० टक्के त्याच गुन्ह्यात अटक होऊन पॅरोलवर सुटलेले असतात आणि त्या काळात ते परत तेच गुन्हे करतात. २०१४ ते २०१९ या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना अशा गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल देऊ नका, असा कायदा केला होता. तो २-३ वर्ष अस्तित्वात होता. पण कालांतराने तो न्यायालयाने रद्द केला. आता पुन्हा तसाच कायदा करा, असे निर्देश देवेंद्र फडणवीसांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत.

# कल्याण येथे एसटी बसचा अपघात, स्कॉर्पिओची धडक; भीषण अपघातात ४ ठार ४ जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : कल्याण-आहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे टोकावडे येथे बस आणि स्कॉर्पिओ कारचा भीषण अपघात (ललळवशर्पी) झाला असून अपघातात स्कॉर्पिओमधील ४ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर, ४ प्रवासी गंभीर जखमी आहेत. विठ्ठलवाडी-कल्याण-आहिल्यानगरला जाणारी बस आणि स्कॉर्पीओ गाडीची धडक बसल्याने हा अपघात झाला. विठ्ठलवाडी आगारातून कल्याण-अहिल्यानगरसाठी सकाळी साडेआठ वाजता ही एसटी निघाली होती. मुरबाड (ढहरपश) तालुक्यातील टोकावडे-वैशाखरे हद्दीत स्कॉर्पिओ



कारसोबत बसची धडक होऊन अपघात झाला. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले होते. मुरबाड-माळशेज घाट महामार्गावरील वैशाखरे वळणावर आज सकाळी भीषण अपघात घडला. एसटी बस आणि स्कॉर्पिओ कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन ४ जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातात चार जण गंभीर जखमी झाले असून जखमींमध्ये दोन मुलांचा समावेश आहे, त्यांच्यावर जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. कल्याणहून अहिल्यानगरच्या दिशेने जाणारी एसटी बस वैशाखरे येथील वळणावर आली असताना समोरुन येणाऱ्या स्कॉर्पिओसोबत तिची जोरदार धडक झाली. ही धडक इतकी भीषण होती की, दोन्ही वाहनांच्या पुढील भागाचा चुराडा झाल्याचं व्हिडिओ आणि फोटोंमधून दिसून येते.

दरम्यान, प्राथमिक माहितीनुसार, कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील वैशाखरे वळणाजवळ ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे. याप्रकरणी, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

## शेतकऱ्यांची पिके धोक्यात; गडचिरोली शहरात वादळी वाऱ्यासह अवकाळी

# राज्यात एकीकडे उन्हाच्या झळा, मराठवाडा अन् विदर्भात अवकाळीने गारवा; गारांचा पाऊस


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून ऊन्हापासून (डींाशी) बचावासाठी वेगवेगळे पर्याय अवलंबत आहेत. तसेच, भरदुपारी घराबाहेर जाणेही टाळले जात आहे. एकीकडे कडक उन्हामुळे अंगाची लाहीलाही होत असताना दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भात अवकाळी पावसाने (ठरळप) हजेरी लावली आहे. काही जिल्ह्यात जोरदार वाऱ्यासह गारांचा पाऊस पडल्याचंही दिसून आलं. जालना, गोंदिया, भंडारा, (चरीरींहुरवर) गडचिरोली, नंदूरबार जिल्ह्यात अवकाळीमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. तर, काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पिकांचं नुकसान झालंय.

जालना तालुक्यातील रामनगर परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने उकाड्यापासून हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. जालना तालुक्यात आज अचानक काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. रामनगर कारखाना परिसरात दुपारी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस बरसला. गेल्या काही दिवसांपासून जालना जिल्ह्यात तापमानाचा पारा वाढल्याने नागरिक उकाड्याने प्रचंड हैराण झाले होते. मात्र, या पावसाने परिसरातील हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिकांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळाला.

गोंदिया जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पाऊस

गोंदिया जिल्ह्यात दुपारनंतर अनेक भागामध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. तर काही ठिकाणी गारांचा देखील पाऊस झाला आहे. या पावसामुळे गोंदिया जिल्ह्यातील कापणीला आलेल्या धान पिकांना मोठा फटका बसला आहे. या



पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून असह्य उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला.

गडचिरोली शहरात वादळी वाऱ्यासह अवकाळी

कडक उन्हाने हैराण झालेल्या गडचिरोलीकरांना आज अचानक दिलासा मिळाला. गडचिरोली शहरात सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दुपारपर्यंत कडक उन्हाने अंगाची लाही लाही होत असतानाच, सायंकाळच्या सुमारास गडचिरोली शहरात हवामानाने अचानक पलटी घेतली. वादळी वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाने शहराला झोडपून काढलं. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची एकच धांदल उडाली. अनेकजण आडोशाला धावताना दिसले, तर काही ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. या अवकाळी पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी शेतकऱ्यांसमोर मात्र नव्या चिंतेचं संकट उभं राहिलं आहे. उन्हाळी पिकांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, हवामान खात्याकडून पुढील काही दिवस अशाच बदलत्या वातावरणाचा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

भंडारा जिल्ह्यात अवकाळीचा तडाखा

गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हाळा आणि असह्य उकाड्यानं हैराण झालेल्या भंडारावासीयांना आज निसर्गानं काहीसा दिलासा दिला. तर दुसरीकडे बळीराजावर चिंतेचे ढग दाटले आहेत. जिल्ह्यात आज दुपारच्या सुमारास अचानक हवामानात बदल झाला आणि अनेक भागात वादळी वाऱ्यासह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. विशेष म्हणजे, तुमसर तालुक्यातील आलेसुर येथे विजांच्या कडकडाटासह गारांचा जोरदार पाऊस पडला. एकीकडे सर्वसामान्यांना उकाड्यापासून दिलासा मिळाला असला, तरी हा पाऊस शेतकऱ्यांसाठी मात्र चिंताजनक ठरला आहे. वादळी वाऱ्यामुळे उभं असलेलं भातपीक जमिनीवर आडवं झालं आहे. तुमसर तालुक्यातील आलेसुर आणि परिसरातील गारपिटीमुळे भाताचे दाणे गळून पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

नंदुरबारमध्ये अवकाळीची हजेरी

अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावून जनजीवन विस्कळीत केले. सध्या लग्नसराई सुरु असल्याने चंदगड, गडहिंग्लज, आजरा, सिंधुदुर्ग आणि गोव्यातून खरेदीसाठी आलेल्या लोकांची पंचाईत झाली. अनेक ठिकाणी झाडें विजेच्या तारावर कोसळल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित झाला. गेल्या दोन दिवसापासून तापमानात वाढ होऊन उष्माही वाढला होता. आज सकाळपासून अनेक वेळा ढग अंधारून आले पण पाऊस आला नाही. सायंकाळी मात्र विजांचा अचानक गडगडाट सुरु होऊन सोसाट्याचा वारा वाहू लागला आणि पावसाला सुरुवात झाली. अद्याप पावसाळ्यापूर्वीचे गटारीचे साफसफाईचे काम झाले नसल्याने गटारीतील पाणी रस्त्यावरून वाहत होते. रस्त्यावर बसून भाजीपाला, फळे आणि अन्य वस्तूंची विक्री करणाऱ्या किरकोळ विक्रेत्यांची देखील सामान आवरताना तारांबळ उडाली. यावर्षी मे १४ रोजी लग्नाचा अखेरचा मुहूर्त असल्याने परगावातून लोक कपडे, भांडी, दागिने खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. खरेदीसाठी आलेल्या लोकांना देखील खरेदी केलेले सामान भिजू नये म्हणून आसरा हुडकताना अनेकांची दमछाक झाली.

## संपादकीय....

### नकारघंटा

निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना बॅनर्जी यांनी निवडणूक आयोगाला लक्ष्य केले. त्यांच्या मते, आयोगाचा संपूर्ण कल हा सत्ताधारी भाजपला झुकते माप देणारा होता. देशात लोकशाहीची उघडपणे हत्या केली जात आहे. मी नेहमीच जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे आणि यापुढेही तो सुरूच राहील. मी राजीनामा देण्यासाठी राजभवनात का जावे? लोकशाही मार्गाने निवडून येण्याचा सन्मान जर पायदळी तुडवला जात असेल, तर त्या यंत्रणेसमोर झुकणार नाही, असे त्या म्हणाल्या. निवडणुकीदरम्यान झालेल्या पोलीस आणि सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या तसेच ईव्हीएम मशीनच्या हाताळणीबाबत त्यांनी संशय व्यक्त केला आहे. बंगालमधील या राजकीय संघर्षात ममता बॅनर्जी एकट्या पडलेल्या नाहीत. 'इंडिया' आघाडीतील प्रमुख नेत्यांनी त्यांना आपला पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. सोनिया गांधी, राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि हेमंत सोरेन यांसारख्या बड्या नेत्यांनी फोनवरून त्यांच्याशी संवाद साधून या परिस्थितीत खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले आहे. लवकरच अखिलेश यादव देखील त्यांची भेट घेणार असून, हा लढा आता बंगालपुरता मर्यादित न राहता राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न विरोधकांकडून होताना दिसत आहे.

## भगवान बुद्धांच्या संदेशानी दुमदुमला धम्मकुटी काळीमाती परिसर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : संपूर्ण जगाला शांती, अहिंसा आणि करुणेचा संदेश देणारे गौतम बुद्ध यांची जयंती (बुद्ध पौर्णिमा) १ मे रोजी अर्जुनी-मोर. तालुक्यात मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यंदा बुद्ध जयंतीसोबतच कामगार दिन आणि महाराष्ट्र दिनाचा दुहेरी योग जुळून आल्याने वातावरण अधिकच उत्सवी झाले होते.

वैशाखी पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी बुद्ध पौर्णिमा निमित्त भगवान बुद्धांचा जन्म, बोधिप्राप्ती आणि महापरिनिर्वाण या त्रिविध घटनांची स्मृती जागविण्यात आली. समाजात वाढत चाललेल्या हिंसा, मत्सर आणि अज्ञानाच्या पार्श्वभूमीवर बुद्धांनी दिलेला अहिंसा, मैत्री आणि करुणेचा संदेशच मानवजातीसाठी खरा मार्गदर्शक असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले. तालुक्यातील विविध बुद्ध विहारांमध्ये उपासक, उपासिकांनी शुभ्र वस्त्र परिधान करून बुद्धं शरणं गच्छामि, धम्मं शरणं गच्छामि, संघ शरणं गच्छामि या त्रिशरणा चा गजर करत वातावरण भारावून टाकले. बुद्ध पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात अंतःकरणातील अंधकार नाहीसा होऊन शांती आणि समाधान नांदो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तालुक्यातील मुख्य कार्यक्रम निसर्गरम्य कालीमाती बुद्ध भूमी येथे पार पडला. या कार्यक्रमाला पूज्य भदंत, जि.प. सदस्य यशवंत गणविर, सामाजिक कार्यकर्ते नानाभाऊ शहारे, समता सैनिक दलाचे अजय अंबादे, हिरकचंद टेंभुर्णे, सुरेखा टेंभुर्णे, दयाराम भालाधरे, इंजी. शहारे, केवलराम लाडे, मुन्नाभाई नंदागवळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान बुद्ध वंदना, त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले. तसेच विविध ठिकाणी धम्म प्रवचन, भीम-बुद्ध गीतांचे कार्यक्रम आणि धम्मभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. एकूणच, अर्जुनी-मोर. तालुक्यात बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात, एकात्मता आणि बौद्ध धम्माच्या मूल्यांची जपणूक करत साजरी करण्यात आली.

## नंगपुरामुर्री शासकीय निवासी शाळा येथे महाराष्ट्र दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक रविशंकर ईठूले यांच्या अध्यक्षतेखाली नीता भलमे, पी ए लांजेवार, साधना पारधी, प्रदीप ढवळे, , मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर, तुषार महाजन, संगिता कुंभरे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी ईठूले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. राष्ट्र गीत, महाराष्ट्र गीत सादरीकरण करुन शाळेतील विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला.

संचालन व आभार आशिषकुमार शहारे यांनी मानले असून बाह्यस्तोत्र कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# राजर्षी शाहू महाराजांचे परिवर्तनवादी कार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर ते पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच महान, दूरदर्शी आणि समाजपरिवर्तनाला आयुष्य अर्पण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ६ मे हा त्यांचा स्मृतिदिन केवळ एक औपचारिक स्मरणदिन नसून, तो सामाजिक समतेच्या, न्यायाच्या आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारातून समाजातील विषमता, अन्याय आणि जातीय भेदभाव यांना ज्या पद्धतीने आव्हान दिले, ते भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी पर्व ठरले. त्यांच्या कार्यामुळे समाजातील वंचित, दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया यांना केवळ संधीच मिळाली नाही, तर सन्मानाने जगण्याचा अधिकारही प्राप्त झाला. म्हणूनच शाहू महाराजांचे कार्य हे केवळ ऐतिहासिक नोंद नाही, तर ते आजच्या आधुनिक भारताच्या सामाजिक रचनेचा एक भक्कम पाया आहे.

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव घाटगे असे होते. लहानपणापासूनच त्यांच्यावर सामाजिक जाणिवांचा प्रभाव होता. त्यांनी समाजातील विषमता आणि अन्याय जवळून अनुभवला होता. पुढे कोल्हापूर संस्थानाच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केवळ प्रशासनासाठी न करता, समाजपरिवर्तनासाठी करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार म्हणजे केवळ सत्ता नव्हती, तर ती एक सामाजिक जबाबदारी होती.

शाहू महाराजांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे प्रमुख साधन मानले. त्या काळात शिक्षण ही केवळ उच्चवर्गीयांची मक्तेदारी होती. बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सुरू केले. त्यांनी दलित, मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभारली, शिष्यवृत्ती दिल्या आणि शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळेच व्यक्ती सक्षम होते आणि समाज बदलतो, या विश्वासातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला.


शाहू महाराजांच्या कार्याचा सर्वात महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू म्हणजे त्यांनी कोल्हापूर संस्थानात १९०२ साली लागू केलेले आरक्षण धोरण होय. त्यांनी सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीयांसाठी ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला मोठे आव्हान देणारा होता. आरक्षणाच्या माध्यमातून त्यांनी वंचित घटकांना सत्तेच्या आणि प्रशासनाच्या केंद्रस्थानी स्थान मिळवून दिले. हा निर्णय केवळ धोरणात्मक नव्हता, तर तो सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष अंमल होता.

जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता ही भारतीय समाजाच्या प्रगतीसाठी मोठी अडचण असल्याचे शाहू महाराजांना जाणवले. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध ठाम भूमिका घेतली. त्यांनी सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि मंदिरे सर्वांसाठी खुले केले. त्यांच्या या निर्णयामुळे समाजातील भेदभाव कमी होण्यास मदत झाली आणि सामाजिक एकात्मतेची भावना वाढीस लागली.

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी शाहू महाराजांनी केलेले कार्यही अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहन दिले, विधवा पुनर्विवाहाला मान्यता दिली आणि स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांच्या मते, समाजाचा विकास हा स्त्रियांच्या सक्षमीकरणाशिवाय शक्य नाही. त्यामुळे त्यांनी स्त्रियांना समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर दिला.

आर्थिक क्षेत्रातही शाहू महाराजांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणे राबवली, सहकारी चळवळीला प्रोत्साहन दिले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली. त्यांनी शेतकऱ्यांना कर्जसवलती, सिंचन सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती सुधारली.

शाहू महाराजांच्या कार्यात धर्मनिरपेक्षतेचा स्पष्ट प्रभाव दिसतो. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता हीच सर्वोच्च मूल्य होती. त्यांनी कोणत्याही धर्माच्या किंवा जातीच्या आधारावर भेदभाव केला नाही.



त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील अनेक समाजसुधारकांवर पडला आणि भारतीय संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांना त्यांनी अप्रत्यक्ष प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे समाजातील वंचित घटकांना आत्मविश्वास मिळाला आणि त्यांनी प्रगतीचा मार्ग धरला.

आजच्या काळात शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. अजूनही समाजात विषमता, भेदभाव आणि अन्याय अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक न्यायासाठी केवळ कायदे पुरेसे नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनाची व्यापकता आणि दूरदृष्टी लक्षात घेतली पाहिजे. त्यांनी समाजातील असमानतेकडे केवळ दयाभावाने पाहिले नाही, तर ती एक संरचनात्मक समस्या आहे, जी राज्यव्यवस्थेच्या सक्रिय हस्तक्षेपाशिवाय दूर होऊ शकत नाही, असे त्यांनी स्पष्टपणे ओळखले. म्हणूनच त्यांनी आपल्या कारभारात केवळ सुधारणा न करता, एक प्रकारे सामाजिक क्रांतीच घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी मिळणे हेच खरे लोकशाहीचे तत्त्व होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर सामाजिक प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी केवळ आरक्षण लागू केले नाही, तर त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. त्यांनी मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये स्थान देताना त्यांच्या प्रशिक्षणाची, कौशल्यविकासाची आणि आत्मविश्वास वाढवण्याचीही काळजी घेतली. त्यांच्या मते, संधी देणे हे पहिले पाऊल आहे, परंतु त्या संधीचा उपयोग करण्यासाठी आवश्यक साधने आणि वातावरण उपलब्ध करून देणे हे तितकेच महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे, त्यांनी समाजातील उच्चवर्गीयांच्या वर्चस्वाला थेट आव्हान दिले. त्या काळात ब्राह्मणवर्गाचे प्रशासन, शिक्षण आणि धार्मिक क्षेत्रांवर मोठे वर्चस्व होते. शाहू महाराजांनी या वर्चस्ववादी रचनेला धक्का देण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा दिला. त्यांनी समाजातील इतर घटकांना सशक्त करून एक समताधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यामुळे समाजात एक नवीन सामाजिक जागृती निर्माण झाली.

शाहू महाराजांचे कार्य केवळ सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी लोककलांना प्रोत्साहन दिले, कलाकारांना संरक्षण दिले आणि समाजातील सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर हे एक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीला वाव दिला, ज्यामुळे समाजात आत्मसन्मानाची भावना वाढीस लागली.

शाहू महाराजांनी पत्रकारिता आणि प्रसारमाध्यमांचा उपयोगही समाजजागृतीसाठी केला. त्यांनी विविध वृत्तपत्रांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक प्रश्नांवर खुल्या चर्चेला चालना दिली. त्यांच्या मते, समाजातील बदलासाठी विचारांची देवाणघेवाण आणि संवाद अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी लोकशाही मूल्यांचा पुरस्कार केला आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याला पाठिंबा दिला.

धर्माच्या बाबतीतही शाहू महाराजांची भूमिका अत्यंत प्रगत होती. त्यांनी धर्माला वैयक्तिक श्रद्धेचा विषय मानले आणि राज्यकारभारात धर्मनिरपेक्षतेचा अवलंब केला. त्यांनी सर्व धर्मांना समान वागणूक दिली आणि धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने समाजातील ऐक्य आणि बंधुता टिकवण्यासाठी धर्मनिरपेक्षता अत्यंत आवश्यक होती.

शाहू महाराजांच्या कार्याचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी सामाजिक न्यायाच्या लढ्याला मानवी मूल्यांशी जोडले. त्यांनी केवळ धोरणे राबवली नाहीत, तर समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांना समतेचे, बंधुत्वाचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून आला.

आजच्या काळात शाहू महाराजांच्या कार्याचा विचार करताना आपण त्यांच्या धोरणांचा आणि विचारांचा आधुनिक संदर्भात पुनर्विचार करणे आवश्यक आहे. आज भारतात शिक्षण, आरक्षण, सामाजिक न्याय आणि स्त्रीसक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये अनेक प्रगती झाली आहे, परंतु अजूनही अनेक आव्हाने अस्तित्वात आहेत. समाजातील काही घटक अजूनही शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत.

आरक्षण धोरणांवर आजही मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि वादविवाद होत आहेत. काहीजण आरक्षणाला विरोध करतात, तर काहीजण त्याचे समर्थन करतात. या वादांच्या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी आरक्षणाला एक तात्पुरती पण आवश्यक उपाययोजना मानली होती, जी समाजातील विषमता दूर करण्यासाठी आवश्यक आहे.

आजच्या काळात 'मेरिट' या संकल्पनेवरही मोठ्या प्रमाणावर चर्चा होते. काहीजण असा युक्तिवाद करतात की, आरक्षणामुळे गुणवत्ता कमी होते. परंतु शाहू महाराजांनी स्पष्टपणे दाखवून दिले की, गुणवत्ता ही केवळ जन्मावर अवलंबून नसून, ती संधी आणि संसाधनांवर अवलंबून असते. जेव्हा समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळतील, तेव्हाच खरी गुणवत्ता विकसित होऊ शकते. शाहू महाराजांच्या कार्यातून आपल्याला हे शिकायला मिळते की, समाजातील परिवर्तनासाठी केवळ कायदे आणि धोरणे पुरेशी नसतात, तर त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक असते. त्यांनी आपल्या कार्यातून समाजात जागृती निर्माण केली आणि समतेच्या मूल्यांचा प्रसार केला.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात सामाजिक न्यायाचे स्वरूप बदलत आहे. नवीन प्रकारच्या विषमता निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेला समतेचा आणि न्यायाचा संदेश आजही तितकाच लागू आहे. राजर्षी शाहू महाराजांचा स्मृतिदिन हा त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा दिवस असला, तरी तो आपल्या सामाजिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणारा दिवसही आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा सखोल अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात येते की, त्यांनी ज्या प्रकारे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांना आपल्या कारभाराच्या केंद्रस्थानी ठेवले, ते आजच्या आधुनिक लोकशाही व्यवस्थेसाठीही अत्यंत मार्गदर्शक आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य केवळ एका संस्थानापुरते मर्यादित राहिले नाही, तर त्याचा प्रभाव संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेवर पडला. त्यांनी समाजातील विषमता दूर करण्यासाठी जे उपाययोजना केल्या, त्या आजही सामाजिक धोरणांच्या मुळाशी आढळतात.

आजच्या भारतात संविधानिक पातळीवर समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये मान्य केली गेली आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची व्यवस्था केली गेली आहे. स्त्रियांसाठी विविध सक्षमीकरणाच्या योजना राबवल्या जात आहेत. शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या सर्व प्रक्रियांमध्ये शाहू महाराजांच्या विचारांची छाप स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी मांडलेली 'समान संधी' ही संकल्पना आजच्या धोरणांचा पाया बनली आहे.

तथापि, आजच्या काळात सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीत अनेक आव्हानेही आहेत. आरक्षण धोरणांवर राजकीय हस्तक्षेप वाढला आहे, काही ठिकाणी त्याचा गैरवापरही होत असल्याची टीका केली जाते. 'क्रीमी लेयर', आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, खाजगी क्षेत्रातील आरक्षण यांसारखे अनेक नवीन प्रश्न उद्भवले आहेत. या सर्व प्रश्नांचा विचार करताना शाहू महाराजांच्या मूलभूत तत्त्वांची आठवण ठेवणे आवश्यक आहे. आरक्षण ही केवळ सवलत नसून, ती ऐतिहासिक अन्याय दुरुस्त करण्याची प्रक्रिया आहे.

आजच्या समाजात 'मेरिट' या संकल्पनेभोवतीही मोठा वाद आहे. काहीजण आरक्षणाला गुणवत्ता कमी करणारे मानतात, तर काहीजण ते सामाजिक समतेसाठी आवश्यक मानतात. या पार्श्वभूमीवर शाहू महाराजांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, संधी मिळाल्याशिवाय कोणतीही गुणवत्ता विकसित होऊ शकत नाही. त्यामुळे आरक्षण आणि मेरिट हे परस्परविरोधी नसून, आरक्षणामुळेच खऱ्या अर्थाने गुणवत्ता विकसित होऊ शकते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक आणि सामाजिक विषमता नव्या स्वरूपात पुढे येत आहेत. तंत्रज्ञानामुळे काही नवीन संधी निर्माण झाल्या असल्या, तरी डिजिटल दरी, शैक्षणिक असमानता आणि रोजगाराच्या संधींमधील विषमता यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी दिलेला समतेचा संदेश आजच्या बदलत्या काळातही मार्गदर्शक आहे.

शाहू महाराजांनी समाजपरिवर्तनासाठी केवळ धोरणात्मक बदल केले नाहीत, तर त्यांनी समाजाच्या मानसिकतेतही परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकांमध्ये समतेची, बंधुत्वाची आणि सहिष्णुतेची भावना निर्माण केली. आजच्या काळातही सामाजिक न्यायाची खरी अंमलबजावणी करण्यासाठी समाजातील मानसिकतेत बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी प्रशासनाला लोकाभिमुख बनवले. त्यांनी सत्तेचा वापर समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केला. आजच्या काळातही प्रशासन अधिक संवेदनशील, पारदर्शक आणि लोककेंद्रित बनवण्याची गरज आहे. या संदर्भात शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी ठरते.

राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृतिदिनानिमित्त आपण केवळ त्यांना श्रद्धांजली अर्पण करून थांबू नये, तर त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपण समाजातील विषमता, अन्याय आणि भेदभाव दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. सामाजिक न्याय ही केवळ सरकारची जबाबदारी नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.

आजच्या भारतात समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी शाहू महाराजांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. शिक्षण, आरक्षण, स्त्रीसक्षमीकरण, आर्थिक विकास आणि सामाजिक ऐक्य या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास समाज अधिक प्रगत आणि समतावादी बनू शकतो. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळावा, हीच खरी लोकशाही आहे. शाहू महाराजांनी आपल्या कार्यातून हीच संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. त्यांनी दाखवून दिले की, सामाजिक परिवर्तनासाठी धाडस, दूरदृष्टी आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपणही समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

शेवटी, राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य हे भारतीय समाजाच्या इतिहासातील एक उज्ज्वल पर्व आहे. त्यांनी समतेचा दीप प्रज्वलित केला, सामाजिक न्यायाचा मार्ग दाखवला आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प करूया. त्यांच्या आदर्शांचा अवलंब करून आपण एक समताधिष्ठित, न्याय्य आणि सशक्त भारत निर्माण करू शकतो हीच त्यांना खरी आणि अर्थपूर्ण श्रद्धांजली ठरेल.




**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

## जिल्हा परिषद प्रशाला इटकुर एनएमएमएस परिक्षेत सावित्री- जिजाऊच्या लेकींचा डंका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल ईटकुर या शाळेतील राष्ट्रीय दृष्ट्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या २०२५-२६ मधिल एन एम एम एस परिक्षेचा निकाल नुकताच लागला आहे. या परिक्षेत सिद्धि महादेव पावले,सुरवसे कल्याणी सतिश,शिंदे आरोही बाळासाहेब, सावंत संजिवनी सुरेश व कुलकर्णी साक्षी शशिकांत या मुली शिष्यवृत्तीधारक झाल्या आहेत. या यशवंत विद्यार्थिनींना दरवर्षी १२ हजार रुपये शिष्यवृत्ती इयत्ता बारावी पर्यंत मिळणार आहे.



जिल्हा परिषद हायस्कूल ईटकुर ने क्रीडा क्षेत्रात ही विविध यश मिळवलेले आहे. शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने नवोदय ,शिष्यवृत्ती परीक्षेत देखील नेहमीच अग्रेसर असते. या उज्वल यशामुळे इतर विद्यार्थ्यांना निश्चित प्रेरणा मिळेल. या मुलीना श्री.महामुद सय्यद, श्री.वृषिकेत चौधरी, श्री.अनिल शिंदे,राहुल बाबर या शिक्षकानी मार्गदर्शन कले.या उज्वल यशाबद्दल प्रभारी गटशिक्षणाधिकारी संतोष माळी, केंद्रप्रमुख सोमनाथ चंदनशिव, प्रशालेचे मुख्याध्यापक चंद्रकांत शिंदे,शाळा व्यवस्थापन समितिचे अध्यक्ष हरिदास पावले, कळंब तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक गणेश कोठावळे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ, शिक्षण प्रेमी नागरिक यांनी मार्गदर्शक शिक्षकांचे व सर्व विद्यार्थयांचे अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358


This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नळदूर्ग येथे पाणी पुरवठ्यावर ४३ कोटी रुपयांचा चुराडा

# पाण्याच्या टाकीच्या पायऱ्या टाकी चालू होण्या अगोदरच कोसळल्या

## निकृष्ट दर्जाच्या पायऱ्या सुजाता कन्स्ट्रक्शनचा अजब कारभार; गुत्तेदारावर ट्रासिटी दाखल करा जनतेची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :

मानवाच्या व प्राणी जीवनातला अत्यावश्यक प्रश्न म्हणजे पाणी नळदुर्ग शहरामध्ये खूप तातडीची ४३ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली आहे. मानवाच्या जीवनातला अत्यावश्यक प्रश्न म्हणजे पाणी आज तागायत नळदुर्ग शहरातल्या अनेक पाणी टाक्यांचे कामे भरदार प्रमाणात चालू आहेत परंतू काही टाक्यांचे काम शिल्लक आहे त्याचे कारण काय आहे हे प्रशासनला माहित आहे. नळदुर्ग शहरातल्या नागरिकांचा खूप जवळचा प्रश्न म्हणून पाणी पुरवठा योजनेला ओळखला जातो परंतु गुत्तेदारांनी स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी आणि निकृष्ट दर्जाच्या कामाला सुरुवात केली आसवी आसे दिसते आहे. आज ही नागरीकांची पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. पाणीपुरवठा योजनेचा नागरिक दहा ते पंधरा दिवसा आड पाणी मिळत असल्याने नागरीकांत नाराजीचा सूर उमटत आहे तरीही नागरीक सहन करतात परंतु नळदुर्ग शहरांमध्ये तातडीच्या पाणीपुरवठा योजना च्या नावाखाली करोडो रुपयेचा चुराडा झाला असून या योजना मोडीत पडल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण आजही पाणी टाक्या अर्धवट अवस्थेत दिसून येत आहेत शिवाय डॉ आंबेडकर नगर शिवकरवाडी वस्तीत १ लाख ६५ हजार लिटरची पाणी टाकी तयार केली असून त्या टाकीवर लोखंडी पायऱ्या बसवल्याची चित्र दिसून येत आहे. टाकीचे काम उर्वरित बाकी असून पाणी टाकीत चढविण्या अगोदरच टाकी वरच्या पहिल्या मजल्याच्या पायऱ्या कोसळल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.

मग वैतागलेल्या आणि पाण्यासाठी वन वन फिरणाऱ्या नागरिकांनी कोणाकडे पाहायचे गुत्तेदार स्वतःची पोळी भाजणार मग प्रशासन गप्प का ? दलित वस्तीत डॉ आंबेडकर नगर मध्ये १ लाख ६५ हजार लिटरच्या टाकीचे काम अर्धवट असताना पहिल्या मजल्याच्या लोखंडी लावलेल्या पायऱ्या चक्क कोसळले असून या पायऱ्याकडे कोणी लक्ष देणार .शिवाय वारंवार हा प्रकार जर घडत असेल तर नगरपालिकेच्या पाणी पुरवठ्याच्या कर्मचाऱ्यांनी पायऱ्यावर कसे चढायचे आगर भविष्यात या पायऱ्या मुळे कर्मचाऱ्यांनाही धोका होऊ शकतो याकडे प्रशासन लक्ष देणार का? कारण गुत्तेदार स्वतःची पोळी भाजून निघून गेलेला असतो.

**मग ठपका कोणार प्रशासनावर पडतो**

दलित वस्तीतल्या नागरिकाला हा प्रताप समजल्यानंतर नागरिकात संतापाची लाट उसळली आहे. केवळ दलित वस्तीत चालू असलेल्या कामावर अंकुश कोणाचा हा प्रकार थांबवण्यासाठी नळदुर्ग शहरातल्या प्रशासनाने प्रत्येक गुत्तेदावर करडी नजर ठेवावी लागणार आहे आणि कामांमध्ये पारदर्शकता असायला हवी यासाठी प्रयत्न करायला हवे परंतु सुजाता कंट्रक्शन धाराशिव यांनी टाकीवरील पायऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याचे असून संबंधित गुत्तेदारावरती अनुसूचित जाती प्रतिबंधक कायद्याखाली आणि शासनाची फसवणूक केल्याच्या निकषा खाली गुन्हा नोंद करावा अशी मागणी नागरिकातून होत आहे.

## परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव (तु.)/ नळदुर्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी ( एस.के. गायकवाड): डॉ. आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्ट आळजापूर ता.बार्शी जि.सोलापूर आणि पंचशील तरुण मंडळ सावरगाव ता.तुळजापूर जि. धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात परिवर्तन सामाजिक संस्था बोरगाव / नळदुर्ग तालुका तुळजापूर या संस्थेस डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

परिवर्तन सामाजिक संस्था नळदृग शी गेल्या अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरण व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकरी,युवक अशा विविध विषयावर सामाजिक कार्य करीत असून या संस्थेच्या कार्याची दखल घेऊन दिनांक ३ मे २२६ रोजी सावरगाव येथे आंबेडकरी शाहिरांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी दंगलकार नितीन चंदनशिवे यांच्या हस्ते परिवर्तन सामाजिक संस्थेला सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेकडून संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांनी हा सन्मान स्वीकारला आहे.या कार्यक्रमास तुळजापूर तालुक्यातील बार्शी तालुक्यातील धाराशिव तालुक्यातील अनेक गायक कलावंत उपस्थित होते. ड .बाबासाहेब बडवे, हरीश फटके, दिलीप फडके, हणमंत फडके यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

यावेळी ड. राम ढवळे, गायक जीवन शिंदे, प्रा.डॉ. दुष्यंत कठारे,सचिन सोनवणे, निलेश वाघमारे उपस्थित होते

## सौ. सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी विज्ञान विभागाचा निकाल १००%

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयातील विज्ञान विभागाचा निकाल १००% लागला असून यामुळे महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. तज्ञ प्राध्यापकाकडून वेळोवेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सातत्याने अभ्यासावर अधिक भर देत असल्यामुळे दरवर्षी विद्यालयाचा निकाल १००% लागत आहे. असे यावेळी संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी



यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात आयोजित यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, रोख पारितोषिक,शाल व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जुनिअर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते.

विज्ञान शाखेतील यश बागलकोटी हा विद्यार्थी ७४.६७ % घेऊन प्रथम आला आहे. शंकर नीळ व कु राजनंदिनी ताकमोगे या दोघानी ७३.३३ % घेऊन द्वितीय तर सिद्धराम कोरे हा विद्यार्थी ७२ टक्के घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.

कला विद्या शाखेचा निकाल ६८.५७ % लागला असून कु सपना चेंडके ७८.८३ घेऊन प्रथम आली, कु विजयालक्ष्मी चेंडके ६६.६७% घेऊन दुसरी तर कु महेक कारंजे ६४.६७ % घेऊन तिसरी आली आहे.

वाणिज्य विद्याशाखेचा ७९.०६ % निकाल लागला असून कु आदिती कटारे ही ७५% मिळवून प्रथम आली, कु समीक्षा मोरे ७३.८३% मिळवून दुसरी तर कु स्नेहा भिकमळी ७१.५०% गुण मिळवून तिसरी आली आहे.

या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी , प्राध्यापक वर्ग व बहुसंख्य पालक उपस्थित होते.

सूत्रसंचलन प्राध्यापक शिवकुमार मठदेवरू यांनी केले तर उपस्थितांचे आभार मधुबाला लोणारी यांनी मानले.

## दामाजी महाविद्यालयात गुणवंत यांचा सत्कार : राहुल शहा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आयुष्यात विद्यार्थ्यांना आपल्या मनाला चौकट न घालता कान आणि डोळे उघडे ठेवून मोठे स्वप्न बघितले पाहिजे आणि ते स्वप्न सत्यात कसे उतरावे यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत असे मत श्री विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल शहा यांनी व्यक्त केली व ते श्री संत दामाजी महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षेमध्ये गौरवित यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात बोलत होते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारीमध्ये मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी बोर्ड प्रमाणपत्र शास्त्र विभागातून प्रथम प्रीती संजय हंगरगे, व द्वितीय अमर प्रधान मनगने , तृतीय दीक्षा भाऊसाहेब ढगे, वाणिज्य विभागातून प्रथम गार्गीय औदुंबर माने, द्वितीय ज्ञानेश्वर गणपत लुगडे, तृतीय सोनम धेनू जाधव, तर कला शाखेतून प्रथम गौरव राठोड, दुतीय यशश्री चंदनशिवे, तृतीय अस्मिता विनायक जगताप, आधी सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने अध्यक्ष राहुल शहा व प्राचार्य औदुंबर जाधव राजेंद्र गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी शहा मनाली आज स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील आणि मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचे यशस्वी होताना दिसत आहे यासाठी मातृभाषेतूनच शिक्षण घेणे आवश्यक आहे विद्यार्थ्यांच्या यशामुळे निश्चितच महाविद्यालयाची शैक्षणिक उंची वाढलेली असून पालकांनी महाविद्यालयावर ही विश्वास दाखवल्याबद्दल त्यांनी आभार मानत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या यावेळी प्राचार्य डॉक्टर औदुंबर जाधव यांनी व प्राचार्य प्राध्यापक राजेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या तर गुणवंत विद्यार्थ्यांनी आम्हाला मिळालेल्या देशांमध्ये महाविद्यालयाचा मोठा वाटा आहे असे सांगत सर्व विद्यार्थ्यांचे आभार मानले तसेच यावेळी वरिष्ठ विभागातील इतिहास विभागाचे विद्यार्थ्यांनी प्रज् विठोबा शिरसागर हिचे मीरा भाईंदर मुंबई येथे तिचे पोलीस पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या पालक शिक्षक व शिक्षक वर्ग सर्व उपस्थित होते व सूत्रसंचालन प्राध्यापक विनायक कलबुर्णे यांनी केले.

## कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील सरस्वती कौलगे ची आंतर विद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड



पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील विद्यार्थिनी सरस्वती कोळी ची आंतर विद्यापीठ राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे ही स्पर्धा मध्य प्रदेश राज्यातील रेवा येथे आयोजित करण्यात येणार असून तिच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे सरस्वती कोळी हिने आपल्या सातच्या पूर्ण सराव चिकाटी व उत्कृष्ट खेळण्याच्या जोरावरही निवड मिळवली असून तिचा या यशाची सर्वत्र कौतुक होत आहे या उल्लेखनीय याच्याबद्दल महाविद्यालयातर्फे तिचा विशेष सत्कार करण्यात आला याप्रसंगी प्राचार्य डॉक्टर बी टी जाधव यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व तिच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागाचे उपप्राचार्य सर्व विभाग प्रमुख जिमखाना विभागातील प्राध्यापक विठ्ठल फुले प्राध्यापक मनोज खपाले प्राध्यापक अनिल परमार तसेच जिमखाना कमिटी सदस्य डॉक्टर भारती सुळके उपस्थित होते व महाविद्यालयाच्या वतीने सरस्वती कोळीगीतेच्या यशाबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत असून आगामी स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी करेल असाही विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



# डॉ. आंबेडकरांचा वैचारिक अन्वयार्थ....!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षीचा एप्रिल महिना आला की बुद्ध, फुले, बसवेश्वर आणि डॉ. आंबेडकर या महापुरुषांच्या जयंत्यि आपण साजरा करतो. महापुरुष म्हणून त्यांचे विचार कार्याला वंदन करतो. आदर्श मानतो. एकाच मंचावर सर्व महापुरुषांचे फोटो लावून जन्मदिवस साजरे करतो. विशेष करून विचारांचा उत्सव आणि नियोजनाची संधी समजतो. विशेष करून डॉक्टर बाबासाहेबांची जयंती धुमधडाक्यात, वाजत गाजत मिरवणुकीने साजरे करतो. वर्षातला एक दिवस आपल्या अस्तित्वाचा समजून मनोभावे डॉक्टर आंबेडकरांच्या पुतळे व प्रतिमाला वंदन करतो. बुद्धपूजा घेतो. एप्रिल मे संपला की आपण पूर्ववत पदावर येतो.

मुळात आंबेडकर चळवळ ही समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यावर आधारित आहे. चळवळीचा मुख्य आधार सेवा सामाजिक न्याय; अभिव्यक्तीस्वातंत्र्य व मानवतावाद या क्रांतीतत्त्वावर या चळवळी उभे आहेत. परंतु ज्याला आंबेडकर नको, ज्यांना फुले नको, ज्याला शिवराय नको, पेरियार नको, गाडगेबाबा नको, अशा व्यक्ती संघटना आणि जातीयवादी संस्था ह्या मानवी जीवनाचे समग्र तत्त्वज्ञान मांडणाऱ्या महापुरुषांचे विचार नष्ट करण्यासाठी सक्रिय आहेत. नव्हे तर समता विरुद्ध समरसता चळवळ गतिमान होत आहे हे चिंताजनक आहे. विचार नजरेआड करण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यांना असे वाटते की, जयंतीच्या नावाखाली डीजे च्या तालावर नाचत रहावे, गरीबीच्या खाईत मारावे, आयुष्यभर झोपडपट्ट्याने राहावे, नोकरीसाठी भटकत राहावे, कर्मणुकीच्या जाळ्यात जाऊन जीवन बरबाद व्हावे, बौद्धिक दृष्ट्या सुधारू नये, वैचारिक दृष्ट्या भनंग व कंगाल व्हावे, असे त्या प्रस्थापितांना वाटते. तेव्हा आंबेडकरवाद्यांनी सावध भूमिका घेणे नितांत आवश्यक आहे. आंबेडकर अनुयायानी आपली विचारनिष्ठा ढळू देऊ नये. आंबेडकर हा भावनेचा विषय नाही. विचारव्यवस्थेचा विचार आहे. विचारांचे उत्क्रांती अभिप्रेत आहे. चळवळीतल्या प्रत्येकाला विचार आणि परिस्थिती यातलं अभिप्रेत आहे. विचार विकास हवा आहे. तो विचार नसता नसलेला माणूस लवकर उध्वस्त होतो. तेव्हा आंबेडकर जयंती गंभीरपणे घ्यावेत जयंतीच्या महिन्यात अनेक सार्वजनिक कार्यक्रम होतात पददलित वेळ काढून वंदनासाठी अतुर असतात. भाषणे, शाहिरी, भीमगीते, जलसे, नाटके इत्यादी समाजप्रबोधन पर उपक्रम आयोजित केले जातात. वर्गणी गोळा केली जाते. सर्व लहानथोर एकवटतात. प्रचंड गर्दी होते. वाजंत्री, भोंगे, डीजे लावले जातात. अलोट गर्दीत डॉ. बासाहेब्राच्या व जीवन व कार्यावर लोकगीते ऐकविली जातात. त्यात वक्ते, संगीतकार, गीतकार, कलावंत व कार्यकर्ते यांचे मोलाचे योगदान ठरते. गीते, भाषणे, नृत्यकला व मिरवणुकातून बाबासाहेबांना शोधण्याचे शोधताना दिसत आहे.

डॉ. आंबेडकरांचा ज्ञान वारसा आपल्याला टिकवायचा असेल तर केवळ प्रबोधनात्मक उपक्रम राबवून राबवता येणार नाही. त्यांच्या विचारांचे अवगाहन कराव लागेल. त्यासाठी शिकावं लागेल, शिकवावा लागेल. आंबेडकरी साहित्य व संस्कृतीचवळ गतिमान करावे लागेल. जगातील अनेक विद्यापीठातून डॉ. आंबेडकरांच्या जीवन व तत्वज्ञानावर संशोधन व विकास उपक्रम चालू आहेत. डॉ. आंबेडकरांना ज्ञानाचे प्रतीक, समानतेचे प्रतीक आणि विश्वप्रणेता म्हणून संबोधले जाऊ लागले आहे. तेव्हा आंबेडकर चळवळीत वैचारिक क्षेत्रातील संशोधक, लेखक, अभ्यासक व प्राध्यापक यांची जबाबदारी मर्यादित ठेवता कामा नये. त्यांचे विचारांचे वैश्विकीकरण अधोरेखित करण्याची गरज आहे. डॉक्टर आंबेडकरांचा वैचारिक वारसा हा भारतीय इतिहासाचा एक भाग आहे. आंबेडकर संस्कृती निर्माण करणे, संवर्धन करणे व संरक्षण करणे ही आंबेडकर अनुयायाचे कर्तव्य व जबाबदारी आहे. यासाठी डॉक्टर आंबेडकरांच्या सर्व लेख, ग्रंथ, भाषणे, पत्रव्यवहार, निवेदने व मुलाखती यांचे दस्तऐवजीकरण करून डिजिटायझेशन व्हायला हवे. जेणेकरून जगातल्या कोणालाही, केव्हाही आणि कुठेही उपलब्ध होईल. यासाठी भाषांतर, बहुसंस्कृतिक व बहुसामाजिक विविध सामाजिक रूढी परंपरा अद्यावत संदर्भ अंतर्भूत करून चांगल्या गोष्टी अधोरेखित करू शकतो. डॉक्टर बाबासाहेबांची जयंती वर विचारांचा जागर असेल तर त्यात सामाजिक प्रश्नांची चर्चा व उत्तरे शोधणे अपरिहार्य ठरावे असे वाटते. चांगले जे आहे ते अनिवार्यदेखील ठरावे. भ्रष्टाचार, दहशतवाद, जातिवाद, धर्मांधता, महागाई, शिक्षणातील नैतिक मूल्यशील, भ्रष्ट राजकारण, लोकचरित्र, स्त्रियांचे प्रश्न, अल्पसंख्याक, पर्यावरण, अन्याय, अंधश्रद्धा, अज्ञान असे असंख्य प्रश्नांची चर्चा व त्यावर उपाय शोधण्याचे चिंतनात्मक साहित्य चर्चा होणे गरजेचे आहे. एवढेच म्हणजेच प्रचलित जयंती कार्यक्रमाला वैचारिक समाज प्रबोधनाचा चेहरा प्राप्त व्हायला हवा.

तसेच डॉक्टर आंबेडकरांचे तत्त्वज्ञान व विचारसरणी मांडण्यासाठी अनेक व्यासपीठांचे चांगल्या शक्तीत रूपांतरण करून गरजेचे आहे. त्यांचे ज्ञानस्रोत संमोहित करण्याचे व जाणीवपूर्वक प्रयत्न अनिवार्य आहे. केवळ आंबेडकरवादी म्हणून पूर्णविराम देता येणार नाही. व्याप्ती वाढवण्यासाठी अनेक क्षेत्रातील आमदार, खासदार, सनदी अधिकारी, लेखक, कलावंत, यांची आंबेडकरी विचार वारसा समृद्ध करण्यासाठी पुढे यायला हवे. प्रत्येक व्यवस्थेत राजकारण हे असतेच. परंतु ज्ञानावंताला कोणताही राजकीय पक्ष नसतो. डॉ. आंबेडकरांचा ज्ञानवारसा, लेखन, समीक्षण, परीक्षण व पुनर्अलेखन अधोरेखित करणे हे एक वैश्विक विचार उपक्रमाचा भाग ठरेल.

अतिशय उग्र जातीव्यवस्था व धर्मव्यवस्था आपल्या संस्कृतीचा भाग होती व आहे. ती जर असेल तर जात आणि धर्म याचे उच्चाटन करण्यासाठी पुढे यायला पाहिजे. सर्व कलावंत, लेखक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मैफिली होऊन समग्र विचार देणारी आंबेडकर संस्कृती ग्रंथ स्वरूपात येणे अगत्त्याचे आहे. अन्यथा प्रतिगामी शक्ती त्यांच्या अजेंडेनुसार कार्यक्रम राबवतील. , एक धर्एम, एक राष्ट्र आणि एक चालुकानिवर्त, निर्माण करतील. तेव्हा समतेचे विचार प्रदर्शित करण्याचे प्रयत्न मर्यादित न ठेवता वाढवावे लागतील. नवी ऊर्जा, नवा विचार, नवे संदर्भ घेऊन पुढे यायला हवे. अलीउकडच्या काळात महापुरुषांचे ज्ञानशक्ती, विचारशक्ती याबाबतचा आदर कमी होत चालला आहे. चंगळवाद व अनिर्बंध राहणीमान, खोट्या प्रतिष्ठांना महत्त्व येत आहे. दुसऱ्या बाजूला केवळ घोषणाबाजी, दादागिरी, पैसा, राजशक्ती यांचे महत्त्व वाढले आहे.

**– डॉ. डी. टी. गायकवाड,**
**माजी ग्रंथालय व माहिती अधिकारी**

# आर्यारवी एंटरटेनमेंटच्या चौथ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात सात बारा, साथ आणि जागा यांनी मारली बाजी

## रंगकर्मी, समाजभूषण आणि कलाभूषण पुरस्कारांचे वितरण; राष्ट्रगीताने सोहळ्याची झाली सांगता







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (केतन भोज) : लघुपटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवात यावर्षी प्रथम पुरस्कार रोख रक्कम रुपये १५०००/- म्हणुन कै.भिकाजी महादेव तेटांबे, कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ पारंबी प्रॉडक्शन आणि भक्ती प्रॉडक्शन निर्मित सात बारा', द्वितीय पुरस्कार रोख रक्कम रुपये १००००/- म्हणुन (स्टार इंजिनिअरिंग एन्ड मेकॅनिकल सर्विसेस) एअर कंडीशनिंग एन्ड रेफ्रिजरेशन सिस्टम जॉब यांच्या सौजन्याने बटवा फिल्म्स साथ तर तृतीय पुरस्कार रोख रक्कम रुपये ५०००/- म्हणुन कै.सावित्रीबाई गुणाजी कोकाटे यांच्या स्मरणार्थ बटवा फिल्म्स जागा यांनी पटकावली आहेत. त्याचप्रमाणे उत्तेजनार्थ लघुपट पुरस्कार रोख रक्कम रुपये १०००/- म्हणुन कै.गीता आनंदा जाधव यांच्या स्मरणार्थ साकव आणि चुना तंबाखु यांना प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे कै.शामराव नारायण व्हटकर, कै.हौसाबाई शामराव व्हटकर यांच्या स्मरणार्थ प्रत्येकी रोख रक्कम रुपये १०००/- आणि पुरस्कार अक्षय वासकर (दिग्दर्शन-सात बारा), राहुल यशोद,अक्षय वास्कर (कथा,पटकथा,संवाद लेखन-सात बारा), मकरंद पांचाळ (छायाचित्रण-जागा), स्मित भगत (बाल कलाकार-चुना तंबाखू), पिंटू पाटील (अभिनेता-सात बारा), श्रेयस भिंगार्डे (संकलक-साकव), शीतल कुलकर्णी (अभिनेत्री-सात बारा), पवन वडूरकर (संगित-सात बारा) इत्यादींना प्रदान करण्यात आले. लघुपट परीक्षणाची सर्वोत्तम जबाबदारी प्रसिद्ध लेखक,दिग्दर्शक अनंत सुतार आणि प्रसिद्ध अभिनेते मकरंद पाध्ये यांनी बजावली. चित्रपट, नाट्य आणि साहित्य क्षेत्रातील दिग्गजांच्या उप-स्थितीने या सोहळ्याला विशेष झळ-ाळी प्राप्त झाली होती. या महोत्सवात गझल नवाज भीमराव पांचाळे, ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक सतीश पुळेकर, ज्येष्ठ रंगकर्मी, नाट्य अभिनेते, दिग्दर्शक के राघव कुमार आणि ज्येष्ठ समाजसेवक,पत्रकार प्रभाकर तोडणकर या दिग्गजांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले: कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळ्याची मंगलमय सुरुवात झाली. आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (त) माध्यमातून या सोहळ्याचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी गझल नवाज भीमराव पांचाळे यांनी गझल गाऊन उपस्थित मान्यवर आणि रसिकांची दाद मिळवली. यावेळी रंगकर्मी, समाजभूषण आणि कलाभूषण पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, समाजसेवक सुनिल शिर्के, अभिनेत्री सिद्धी कामथ, गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक-दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले, चांगला स्वभाव हा गणितातल्या शून्यासारखा असतो; त्याला स्वतःला किंमत नसते, पण दुसऱ्यासोबत जोडला तर त्याची किंमत वाढते. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादामुळेच हा प्रवास इथवर पोहोचला आहे. राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली.

# विक्रोळी पार्कसाईट येथे भाजपाचा विजयी जल्लोष





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपरक्केतन भोज : पश्चिम बंगाल,आसाम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदण-ीत विजयाचा आनंद विक्रोळी पार्कसाईट जांभळी नाका येथील वॉर्ड क्र.१२३/१२४ भाजपा कार्यालयात भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मिठाई वाटप व घोषणाबाजी करत भाजपा कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष साजरा केला.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैनतेय विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा इयत्ता १२ वीचा १०० टक्के निकाल, यशाची परंपरा राखली कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील वैनतेय विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सचा इयत्ता १२ वीचा निकाल १०० टक्के लागला असून या कॉलेजने १०० टक्के यशाची परंपरा कायम राखली आहे.

या कॉलेजचे १३१ विद्यार्थी इयत्ता १२ वीच्या परीक्षेस बसले होते. यात १३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या कॉलेजचे ४८ विद्यार्थी विशेष प्राविण्यात, ७६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ०७ विद्या-र्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

या कॉलेजमध्ये प्रथम ५ आलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

प्रथम - ऋषांक सुनील गायखे (८६.००%),द्वितीय - शिफा साहिल शेख (८५.५०%), अर्जुन दत्तात्रय कडपे (८५.५०%),

तृतीय - अदिती ज्ञानेश्वर निकम (८४.६७%), चतुर्थ - अथर्व गोरक्षनाथ राजोळे(८३.००%), पाचवा - साहिल प्रकाश सावंत (८२.८३%)

यशस्वी विद्यार्थी आणि मार्गदर्शन करणारे प्राध्यापक यांचे न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे, वैनतेय विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, पर्यवेक्षिका श्रीमती आर. एम. लाहोटी आदींनी कौतुक केले.

# आमदार रोहित पवार यांची टाकळीवाडी येथील अमर जवान, तसेच अमर जवान रोहित खनिकुडे त्यांच्या घरी भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील अमर जवान स्मारक येथे आमदार रोहित पवार यांची भेट देऊन अमर जवान रोहित खनिकुडे यांच्या घरी भेट देऊन रोहितच्या आई-वडिलांचे सांत्वन करून धीर दिला.

यावेळी उपस्थितीत तंटामुक्त अध्यक्ष माजी सुभेदार केंदबा कांबळे, ऑनररी कॅप्टन रमेश निर्मळे, माजी सुभेदार संजय बदामे, माजी सैनिक महादेव बदामे, टाकळी चे माजी सरपंच उमेश पाटील,युवा नेते सागर पाटील,



# नरसापूर बलात्कार प्रकरणी राज्य सरकारने राजीनामा द्यावा राज्यपाल यांच्याकडे केली मागणी-मनसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक ४ मे रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल साहेब यांना निवेदन देण्यात आले यात मौजे नरसापूर तालुका भोर जिल्हा पुणे येथे एक चार वर्षांच्या लहान मुली-वर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली तसेच काल चाकण येथे ३वर्षाच्या मुलीवर बलात्कार करून अमानुष खुन, अत्याचार तिची निर्दयी हत्या हि केवळ संतापजनक नाही तर संपूर्ण समाजव्यवस्थेच्या संवेदनशीलतेवरच प्रश्नचिन्ह



उभे करणारी घटना आहे या घटनेने महाराष्ट्राच्या मातीला काळीमा फासला असुन, म ानवतेचा कळसच ढासळल्याचे चित्र समोर आले आहे.
या राक्षसी कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना कोणतीही दया ना दाखवता फासावर चढवावे राज्यात खुन,बलात्कार,डग्ज तस्करी,दरोडे चोरी यांचे प्रमाण जास्त आहे गृहमंत्री कांहीच कार्यवाही करत नाही, महाराष्ट्राची जनता प्रचंड आक्रोशात असुन केवळ निषेध,शोक आणि आश्वासनाच्या पलीकडे जाऊन ठोस आणि पारदर्शक कार्यवाही झाली नाही तर जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास पूर्णपणे ढासळेल तरी मा.राज्यपाल साहेबांनी राज्य सरकार चा राजीनामा घ्यावा व राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी करण्यात आली हे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा सचिव दादा कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आली यावेळी तालुकाध्यक्ष सलिम औटी, शहर अध्यक्ष निलेशभैय्या जाधव, बबनराव वाघमारे, विनोद बलाडे,शहाजी गायकवाड आदी उपस्थित होते..

**बौद्ध उपासकांची मागणी : शासकीय निधी तरतूद करावी**

# धम्मकुटी काळीमाती पर्यटनस्थळाचे सौंदर्य वैभव वाढवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी : जवळील काळीमाती धम्मकुटी पर्यटनस्थळ हे बाराभाटी-सुकळी -प्रतापगड-गोठणगाव मार्गावर निसर्गसंपन्न अशा रम्य सौंदर्याच्या ठिकाणी वास्तवात आहे. या पर्यटनस्थळाकडे लोकप्रतिनिधींचे अजीबात लक्ष दिसत नाही. विकास तर नाही, पण स्वच्छतेपासून अलिप्त आहे. म्हणून या पर्यटनस्थळाचे सौंदर्य वैभव वाढविणे अगत्याचे आहे. अशी मागणी बौद्ध उपासकांची आहे.



या पर्यटन स्थळाला 'क' दर्जा प्राप्त झाला असून, येथे अनेक वर्षांपूर्वा स्मृतिशेष १९९० कालावधीत भदंत प्रज्ञाज्योती यांनी काळीमाती येथे धम्म कुटी बनविली व येथे बौद्ध समाजाच्या उपासकांचे श्रद्धास्थळ तयार झाले. तेव्ह-ापासून आजपर्यंत हे ठिकाण नावारूपास आहे, याठिकाणाचा पाहिजे तसा विकास करण्यात आला नाही. येथे अजू-नही विकास झालेला नाही. या जागेला संरक्षण भिंत पुर्ण नाही, तयार करण्यात आलेल्या उपासकांच्या निवासस्थानाच्या इमारतीच्या निकृष्ट बांधकामामुळे फटी पडल्या आहेत. अनेक इमारतींचा भाग हा कमकुवत झाला आहे. शौचालय व नळफिटिंग हे उत्तम दर्जाचे करण्यात आले नाही व त्यात स्वच्छतागृह चांगले नाही. या स्थळाकडे कुणाचेही लक्ष नाही. विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधी विशेष लक्ष घालत नाही. कंत्राटदार लोकप्रतिनिधी असून या पर्यटनस्थळाचा बांधकाम स्वार्थापोटी निकृष्ट केला आहे.

येथे ओला-सुका कचरा असून, उदयी-वाळवीचे मोठे ढीग जमले आहे. सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका वाढला आहे. देखभालीसाठी कुणी नसून, हे स्थळ ग्रामपंचायत सुकळी-खैरी-बोळदे अंतर्गत असून त्यांचेही याकडे लक्ष नाही.

समाज बांधव व समितीचा कानाडोळा

काळीमाती पर्यटनस्थळाचा विकास व्हावा व याला एक सौंदर्यवत वैभव प्राप्त व्हावे, असे प्रयत्न होताना दिसत नाहीत. समाजातील पुढारी, सामाजिक कार्यकर्ते व समितीच्या लोकांचा कानाडोळा झाला आहे. अशा प्रकारच्या दुर्लक्षाम ुळे या स्थळाचा सौंदर्य वैभव झालेला नाही.

बौद्ध समाज बांधवांचे प्रत्येक कार्यक्रम येथे व्हायला पाहिजेत. विचारांची देव-ाण-घेवाण झाली पाहिजे व विकासही व्हावा. यासाठी निधी उपलब्ध करून याचा विकास साधावा आणि सर्वोत्तम दर्जा प्राप्त करून द्यावा, अशी मागणी बौद्ध उपासक करीत आहेत.

येथे सर्वांनी एकत्र येऊन काम करावे. पैशांचा चांगला वापर करून विकास करावा व सोईसुविधा निर्माण केल्यास दर्जा उंचावेल. या स्थळाला बघितल्यास असे वाटते की, याला एक मोठा दर्जा मिळू शकतो, पण विकास व सुविधा नाहीत. कोणाचेही लक्ष नाही, म्हणून ही परिस्थिती आहे.

# मंगरूळ ग्रामपंचायतीचा नियोजनशून्य कारभार; ग्रामस्थ अखेर उपोषणाला



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मौजे मंगरूळ येथे भीषण पाणीटंचाईमुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी अखेर पंचायत समिती कार्यालय, चिखली समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. ग्रामपंचायतीच्या नियोजनशून्य व निष्क्रिय कारभारामुळे गावकऱ्यांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

माहितीनुसार, मंगरूळ गावासाठी सन २०२१ मध्ये शासनाकडून सुमारे ६७ लाख रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत पाईपलाईन, विहीर आणि वीज कनेक्शन देण्यात येणार होते. मात्र, ही योजना प्रत्यक्षात, निकृष्ट दर्जाचे काम व नियोजनाच्या अभावामुळे ग्राम स्थांना थेंबभर पाणीही मिळाले नाही. ठेकेदार व ग्रामपंचायत प्रतिनिधी यांच्या संगनमतामुळे पाईपलाईन बुडीत क्षेत्रातून टाकण्यात आल्याने ती वारंवार लीक होत आहे. परिणामी लाखो रुपये खर्चूनही योजना पूर्णपणे निष्प्रभ ठरली आहे.

यापूर्वीही ग्रामस्थांनी ५ मेप-ासून उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र, ग्रामपंचायत प्रशास-नाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने अखेर ग्रामस्थांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला.

गेल्या दोन वर्षांपासून पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या मंगरूळ गावातील नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, शास-नाचा पैसा पाण्यात गेला असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि मंगरूळवासीयांची तहान भागवावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.